सकाळ

सकाळ अॅग्रोवन सरपंच महापरिषद २०१६ • शिर्डी

पुणे। कोल्हापूर। नाशिक। मुंबई। औरंगाबाद। सोलापूर। नागपूर। सातारा। जळगाव येथून प्रसिद्ध

www.esakal.com SakalNews Call Centre : 9225800800 @esakalupdate



करा. तो कार्यकाळात पूर्ण करण्याचा चंग बांधा.

– **पंकजा मुंडे**, ग्रामविकासमंत्री



**पारंपरिक पद्धतीला सोडून नवीन तंत्रज्ञानाने शेती करण्यासह शेतीमध्ये शेतकऱ्यांच्या कंपन्या उभारून 'कॉर्पोरेट फार्मिंग' वाढण्याची गरज आहे.**

– **अभय फिरोदिया**, अध्यक्ष, फोर्स मोटर्स

१०

|| सरपंच महापरिषदेच्या सविस्तर वार्तांकनासाठी वाचा 'अॅग्रोवन' ||

# सरपंचांनो, परिवर्तन घडवा! : फडणवीस

## सरपंच महापरिषदेचे थाटात उद्घाटन

**शिर्डी, (जि. नगर) ता. १९ :** सरपंचांना शासनाच्या मदतीने गावांमध्ये परिवर्तन घडविण्याची मोठी संधी आहे. आपल्याला मिळणारे ज्ञान लोकांपर्यंत पोचवा. विकासाची एकत्रित संकल्पना राबवा. तुम्ही खरे जनतेचे प्रतिनिधी, दुवा आहात. परिवर्तनाचे दूत म्हणून अॅग्रोवन सरपंच महापरिषदेतून परत जा आणि शेतकरी व सामान्य माणसांच्या जीवनात परिवर्तन घडविण्यासाठी कटिबद्ध व्हा, परिवर्तन घडवा... सरकार आपल्या पाठीशी उभे राहील, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरातील सरपंचांना येथे केले.

पान १३ वर »

## फायद्याची शेती करावी

"शेती हा व्यवसाय आहे. मात्र तो करताना फायदा-तोट्याच्या आर्थिक बाबींची माहिती बहुसंख्य शेतकऱ्यांना नसते. गुणवत्ता वाढवतानाच खर्च कसा कमी करता येईल, याचा विचार करून आर्थिकदृष्ट्या फायद्याची शेती केली पाहिजे,'' असे मत 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी व्यक्त केले.

शिर्डी येथे 'सकाळ-अॅग्रोवन'च्या वतीने आयोजित पाचव्या सरपंच महापरिषदेच्या उद्घाटन सत्रात आज उपस्थित सरपंचांना मार्गदर्शन करताना

पान १३ वर »



**शिर्डी, जि. नगर :** अॅग्रोवन सरपंच महापरिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी सरपंचांना मार्गदर्शन करताना फडणवीस. व्यासपीठावर (डावीकडून) 'सकाळ'चे मुख्य संपादक श्रीराम पवार, गृहराज्यमंत्री प्रा. राम शिंदे, ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे, 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार, 'फोर्स मोटर्स'चे अध्यक्ष अभय फिरोदिया, 'अॅग्रोवन'चे संपादक आदिनाथ चव्हाण.

LOAN
@ 10%
AGAINST PROPERTY
(Above 20 lacs)
• For Residential & Commercial Property*
• Lease Rental Discounting*
*Conditions apply
Contact : YOGESH AGRAWAL
9823176469, 9922310090

UPSC
Weekend Batch for Working Professionals
FREE SEMINAR
Sunday, 21 Feb @ 11am
Guidance Rahul Pandve
The Unique Academy CAMP Branch
E wing Parmar Trade Centre, Near Pune